दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● मंगळवार दि.७ ऑक्टोबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ५० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Tuesday 7 Oct 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 50 ● Pages 4 ● Rate 4 Rs

### मराठवाडा-सोलापूरसाठी अपेक्षेचा किरण नाही

**मुंबई**-मराठवाडा आणि सोलापूर विभागात यंदा अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे आणि सामान्य जनतेचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक घरांची छप्परं उडाली, शेती वाहून गेली आणि हातातल्या कामांवर पाणी फिरले. अशा परिस्थितीत सरकारकडून किमान 'आनंदाचा शिधा' तरी मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, दिवाळी अवघ्या काही दिवसांवर आली असताना प्रशासनिक यंत्रणा आणि शासन स्तरावर कोणतीही तयारी दिसत नाही. त्यामुळे या भागांतील लोकांच्या नाराजीला ऊत आला आहे. गोरगरीबांच्या सणाचा आनंदही राजकारणात बळी जातोय, अशी प्रतिक्रिया सामान्य नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# लाडकी बहीण योजनेमुळे सर्वच खात्यांना निधीची कमतरता-मंत्री भुजबळांची कबुली

### लाडकी बहिणींना २१०० रुपये केल्यानंतर ओढाताण होणार

**राज्य सरकारकडे आताच निधीची कमतरता आहे, तर मग लाडकी बहीण योजनेचा हप्ता २१०० रुपये केल्यानंतर काही परिणाम होणार का? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता भुजबळ म्हणाले, सगळ्याच विभागांना निधीची कमतरता निर्माण झालेली आहे. पीडब्ल्यूडी विभागात ८४ हजार कोटींचा बॅकलॉग होता. यावर मंत्रिमंडळात सुद्धा चर्चा झाली. पैशाचे सोंग करता येत नसल्याचे अजितदादांनीही सांगितले आहे. त्यामुळे लाडकी बहीण योजनेचे पैसे वाढल्यानंतर कुठे ना कुठे ओढाताण होणार. मी अर्थतज्ञ नसल्यामुळे आर्थिक घडी विस्कटते की नाही त्यावर अधिक बोलणे कठीण वाटते.**



**मुंबई (वृत्तसंस्था)**-राज्यात आर्थिक ओढाताण अधिक तीव्र होत चालली असताना अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी लाडकी बहीण योजना, आनंदाचा शिधा आणि शिवभोजन थाळी यांसारख्या योजनांवरील निधीअभावाची स्पष्ट कबुली दिली आहे. लाडकी बहीण योजना ३५ ते ४० हजार कोटी रुपयांवर जाते, त्यामुळे काही गोष्टी यंदा करता येणार नाहीत, असे सांगत भुजबळ यांनी सरकारच्या आर्थिक मर्यादांचा उल्लेख केला. निधीअभावामुळे योजनांमध्ये ओढाताण होणार असल्याचेही भुजबळ म्हणालेत.राज्य सरकारकडून सणासुदीच्या काळात आनंदाचा शिधा वाटप केला जायचा. मात्र, आता ही योजना बंद पडणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. २०२३ मध्ये सरकारने गुढीपाडवा, आंबेडकर जयंती, गणेशोत्सव आणि दिवाळी यावेळी 'आनंदाचा शिधा' वाटप केले होते. परंतु यंदाच्या गणेशोत्सव आणि दिवाळीत सरकारकडून आनंदाच्या शिधाबाबत कोणतीही हालचाल झाली नाही. त्यामुळे 'शिवभोजन थाळी' प्रमाणेच ही योजना देखील निधीअभावी बंद होणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. या पार्श्वभूमीवर छगन भुजबळ यांनी आपली भूमिका मांडली आहे.
छगन भुजबळ यांनी आज प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. लाडकी बहीण योजना ३५ ते ४० हजार कोटी रुपयांवर जाते. तेवढे पैसे काढायचे म्हटल्यास सगळीकडेच या गोष्टीचा फटका बसतो, असे मला स्वत:ला वाटत असल्याचे भुजबळ म्हणाले. राज्यात पावसामुळे शेतीची प्रचंड हानी झाली असून, त्यालाही मोठ्या प्रमाणावर निधी द्यावा लागणार आहे. त्यामुळे निधीची ओढाताण होत राहणार आहे. म्हणून काही गोष्टी यावर्षी करता येणे शक्य नाही, अशी प्रतिक्रिया छगन भुजबळ यांनी दिली.शिवभोजन थाळीच्या निधीसाठीही आम्हाला प्रयत्न करावे लागतात. २ लाख लोकांना प्रतिदिन भोजन दिले, तर या योजनेचे सुद्धा वर्षाला १४० कोटी रुपये लागतात. परंतु आतापर्यंत ७० कोटी रुपये मंजूर झालेले आहेत. त्यातील सगळेच पैसे मिळाले, असे मला वाटत नाही. शिवभोजनचा लाभ घेणारी मंडळी गरीब असतात. त्यांचे हातावर पोट असते. त्यांच्यासाठी निधीची तक्रारी येत असतात. पण आम्ही आमचे पैसे मागण्याचे काम करत असतो. पुढे काय करायचे ते अजून स्पष्ट झाले नाही. त्यासंदर्भात मंत्रिमंडळात निर्णय घ्यावा लागेल, असे छगन भुजबळ म्हणाले.

### आनंदाचा शिधा योजना बंद होणार का?

**आनंदाचा शिधा बंद होण्याची चर्चा सुरू आहे. यावरही छगन भुजबळ यांनी प्रतिक्रिया दिली. येणाऱ्या काळात असे होईल, याबाबत मला कल्पना नाही. भविष्यात एखादा कार्यक्रम आल्यानंतर त्यावेळी निधीची काय परिस्थिती असेल, ते आता सांगू शकणार नाही. आमच्या विभागाकडे गहू आणि तांदूळ असतात. ते आम्ही सुरुवातीलाच पूरग्रस्तांना दहा-दहा किलो वाटप केलेले आहे. सरकारही पाच-पाच हजार रुपये देत आहे. बाकीचे पंचनामे करून भारत सरकार निश्चितपणे मदत करणार असून, त्यानंतर आपल्यालाच प्रयत्न करावे लागेल आणि शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवावे लागणार आहेत.**

## कपिलधारवाडीत जमीन खचली;तातडीने सर्वेक्षण करा

### खा.बजरंग सोनवणे यांचे भारतीय भूगर्भ सर्वेक्षण विभागाला पत्र

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड | प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पाली ग्रामपंचायत हद्दीतील कपिलधारवाडी परिसरात निर्माण झालेल्या जमिनीतील भेगा व जमीन खचणे या गंभीर भूगर्भीय परिस्थितीवर तातडीने वैज्ञानिक भूगर्भ सर्वेक्षण करण्यात यावे, असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी महानिदेशक, भारतीय भूगर्भ सर्वेक्षण (ऋड्ख), भारत सरकार, नवी दिल्ली यांना दिले आहे.खा.बजरंग सोनवणे यांनी पत्रात म्हटले आहे, कपिलधारवाडी गाव व त्याच्या परिसरात (पाली ग्रामपंचायत) गेल्या काही दिवसांपासून अत्यंत गंभीर भूगर्भीय स्थिती निर्माण झालेली आहे, या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे.अलीकडच्या काही दिवसांत या परिसरात जमिनीत मोठ्या भेगा पडल्याचे दिसून आले असून त्या झपाट्याने वाढत आहेत. अनेक ठिकाणी जमीन खचल्याचेही स्पष्ट दिसते. त्यामुळे परिस्थिती अत्यंत गंभीर



बनली असून स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतजमिनी, घरं, सार्वजनिक रस्ते इत्यादींना संभाव्य धोका निर्माण झाला आहे. या घडामोडींच्या स्वरूपावरून हे स्पष्ट होते की या भागात अनपेक्षित व धोकादायक भूगर्भीय बदल होत आहेत. या परिस्थितीच्या गांभीर्याचा तातडीने विचार करून भारतीय भूगर्भ सर्वेक्षण विभागाने (GSI) केंद्रातील तज्ञांची टीम तातडीने पाठवून कपिलधारवाडी परिसर व आजूबाजूच्या भागाचा सखोल भूगर्भीय व भू-तांत्रिक सर्वेक्षण करावे. या सर्वेक्षणाद्वारे भूस्खलन व भेगा पडण्यामागील शास्त्रीय कारणे शोधावीत व तात्काळ प्रतिबंधक व सुधारात्मक उपाय सुचवावेत. आवश्यक असल्यास पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय तसेच राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (छऊच-) यांच्याशी समन्वय साधून बाधित क्षेत्रातील सुरक्षिततेची खात्री करावी आणि पुढील मानवी व पर्यावरणीय हानी टाळावी.या विषयाचे आपत्तीजन्य व तातडीचे स्वरूप लक्षात घेऊन या प्रकरणास प्राधान्य देऊन आपल्या प्रादेशिक तसेच केंद्रीय विभागांतून तातडीने कार्यवाही करावी, असेही खा.बजरंग सोनवणे यांनी म्हटले आहे.याच आशयाचे निवेदन राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेन्द्र फडनवीस व उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री श्री अजितदादा पवार यांना देऊन या गंभीर बाबीकडे राज्य शासनाचे लक्ष वेधले आहे.

## बीड-मुंबई विशेष रेल्वे गाडीची मागणी

### वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड | प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६ डिसेंबर रोजी मुंबईतील चैत्यभूमीवर देशभरातून लाखो अनुयायी श्रद्धांजली वाहण्यासाठी गर्दी करतात. या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यातील अनुयायांना प्रवासाची सोय व्हावी, यासाठी बीड ते मुंबई दरम्यान विशेष रेल्वे सेवा सुरू करण्याची मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.
ही मागणी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांच्या नेतृत्वाखालील प्रतिनिधी मंडळाने जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देऊन केली. या निवेदनात नमूद करण्यात आले




आहे की, ४ डिसेंबर ते ८ डिसेंबर या कालावधीत राज्यातील विविध स्थानकांवरून विशेष रेल्वे सेवा सुरू केल्या जातात. मात्र बीडहून थेट मुंबईला जाणारी कोणतीही विशेष गाडी उपलब्ध नसल्याने, दरवर्षी हजारो अनुयायांना प्रवासात प्रचंड अडचणींचा सामना करावा लागतो.निवेदनात स्पष्टपणे सांगण्यात आले आहे की, बीड जिल्ह्यातील लाखो अनुयायांना चैत्यभूमीवर पोहोचण्याचा मार्ग सुलभ व्हावा, यासाठी बीड रेल्वे स्थानकावरून थेट मुंबईकडे विशेष रेल्वे सेवा तात्काळ सुरू करावी. तसेच जिल्हा प्रशासनाने रेल्वे विभाग व राज्य शासनाशी पाठपुरावा करून ही सेवा लवकरात लवकर उपलब्ध करून द्यावी, अशी ठाम मागणी यावेळी वंचित बहुजन आघाडी बीड जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, महासचिव खंडू नाना जाधव, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कोठेकर,संदीप जाधव, रोहन मगर, जंजाळ सर, मिलिंद सरपते आदींच्या वतीने करण्यात आली.या निवेदनाद्वारे वंचित बहुजन आघाडीने प्रशासनाचे लक्ष वेधत म्हटले आहे की, बाबासाहेबांच्या अनुयायांसाठीची ही सेवा ही केवळ सोय नाही, तर भावनांचा सन्मान आहे.

## दारूच्या नशेत पेट्रोल पंपाला माचिस लावून फावड्याने तोडफोड

### कर्मचाऱ्यांनी जीव वाचवला, आरोपीवर गुन्हा दाखल

**दैनिक वादळ वार्ता | रविंद्र वळवी | मोलगी**

नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव तालुक्यातून एक अत्यंत धक्कादायक आणि गंभीर घटना समोर आली आहे. धनाजे खुर्द येथील प्रतीक्षा पेट्रोलियम या पेट्रोल पंपावर एका माथेफिरूने दारूच्या नशेत पेट्रोल पंपाच्या डिस्पेन्सर युनिटला (मशीनला) माचिस लावून पेटवण्याचा प्रयत्न केला, तसेच फावड्याने तोडफोड करून कर्मचाऱ्यांचा जीव धोक्यात आणला. हा संपूर्ण थरार दिनांक ३ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजून ३० मिनिटांच्या सुमारास घडला. या धक्कादायक प्रकारात पंपावरील कर्मचारी थोडक्यात बचावले आहेत.
धनाजे येथील प्रतीक्षा पेट्रोल पंपाचे संचालक सुभाष शंकर पावरा (वय ४२) यांनी या प्रकरणी धडगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादीनुसार, आरोपी विनेश उर्फ विना दानक्या पावरा (रा. धनाजे) हा काही एक कारण नसताना दारूच्या नशेत पंपावर आला.
त्याने प्रथम पेट्रोल पंपाला माचिस लावत आग लावण्याचा प्रयत्न केल्यामुळे परिसरात मोठी दहशत पसरली. कर्मचाऱ्यांनी लगेच हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करताच आरोपीने हातातील फावडा घेऊन थेट पेट्रोल भरण्याच्या डिस्पेन्सर युनिटवर आणि कपाटावर हल्ला केला. त्याने फावड्याच्या साहाय्याने हे युनिट आणि कपाट फोडून नुकसान केले तसेच शिवीगाळ केली.
पेट्रोल पंपावर अशा प्रकारे आग लावण्याचा प्रयत्न आणि शस्त्राने तोडफोड केल्यामुळे मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती, मात्र कर्मचाऱ्यांनी




प्रसंगावधान राखून आरोपीपासून दूर होत आपला जीव वाचवला.आरोपीच्या या धक्कादायक कृत्याचे संपूर्ण चित्रीकरण पेट्रोल पंपावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहे. पोलिसांनी या घटनेची गंभीर दखल घेतली आहे.
याप्रकरणी धडगाव पोलीस स्टेशनमध्ये आरोपी विनेश उर्फ विना दानक्या पावरा याच्याविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३२४(४) (धोकादायक आयुधांनी दुखापत पोहोचवणे) आणि ३५२ (हल्ला करणे) नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
गुन्हा दाखल करणारे अंमलदार पोलीस नाईक सुनिल चौधरी असून, पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल हरीलाल कोकणी हे करत आहेत. प्राथमिक माहितीनुसार, आरोपी विनेश पावरा याच्यावर यापूर्वीही सन २०१९ मध्ये दोन गुन्हे ( गुन्हा रजिस्टर क्रमांक ३८/२०१९ आणि ६८/२०१९) नुसार गुन्हे दाखल आहेत. गुन्हा दाखल होऊनही आरोपीला अद्याप अटक करण्यात आलेली नाही.

## जीवघेणा नाला! आमलाड-बोरद रस्त्यावरील कठड्यांअभावी दोन वर्षांत दोघांचा बळी

### तातडीने उपाययोजना करा, ग्रामस्थांची संतप्त मागणी

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार | दिपक गोसावी**

तळवे-आमलाड परिसरातून जाणारा आमलाड ते बोरद हा रस्ता आता केवळ प्रवासाचा मार्ग न राहता, अनेक वाहनधारकांसाठी 'जीवघेणा नाला' ठरत आहे. आमलाडपासून सुमारे एक किलोमीटर अंतरावर असलेल्या या मुख्य नाल्यावर गेल्या अनेक वर्षांपासून संरक्षण कठडे नसल्याने मोठे अपघात झाले असून, केवळ दोन वर्षांच्या कालावधीत दोन निष्पाप लोकांचा बळी गेला आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, सार्वजनिक बांधकाम विभाग व लोकप्रतिनिधींनी यावर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी जोर



धरू लागली आहे.आमलाड नजीकच्या या नाल्याने अनेक गंभीर अपघात पाहिले आहेत. स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन वर्षांपूर्वी याच रस्त्यावर बोरदकडून येणाऱ्या मोटरसायकलचा मोठा अपघात झाला होता. रस्त्याचा अंदाज न आल्याने दुचाकी थेट नाल्यात कोसळली, ज्यात बहुरूपा येथील एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला होता.या घटनेला दोन वर्ष उलटत नाहीत तोच, मागील वर्षी याच नाल्यात पडून एका पोलीस पाटलाचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. वारंवार होणाऱ्या या जीवितहानीमुळे हा नाला वाहनधारकांसाठी 'यमदूताचा फास' ठरत आहे.

### वाढलेली झुडपे आणि कठड्यांचा अभाव: दुहेरी धोका

**सद्यस्थितीत पावसाने जोर धरल्यामुळे नाल्याच्या अगदी रस्त्याच्या काठालगत मोठी झाडे आणि झुडपे वाढली आहेत. यामुळे वाहनधारकांना नाल्याचा अंदाज येणे तर दूरच, पण तो नेमका कुठे आहे हे ओळखणेही कठीण झाले आहे. त्यातच कठडे नसल्याने, रात्रीच्या वेळी किंवा वेगाने येणाऱ्या वाहनधारकांना हा धोका अजिबात दिसत नाही आणि मोठा अपघात होण्याची भीती कायम आहे.**

## रोकश्वरी आई देवी मंदिर जिर्णोद्धार व कलशरोहन कार्यक्रमास उपस्थित राहावे-नरेश महाराज

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड | प्रतिनिधी**

दि. ०७ ऑक्टोबर २०२५ रोजी पिंपळगाव घाट ता बीड येथील दरवर्षीप्रमाणे कोजागिरी पौर्णिमा यात्रा भरणार असून जाग्रत देवस्थान रोकड्याआई देवीच्या मंदिराचा जीर्णोद्धार व कलशरोहन कार्यक्रम होणार आहे. या ठिकाणी सकाळी १० ते १२ या वेळेत विदर्भरत्न हभप संजय महाराज पाचपोर यांचं सुश्राव्य असे हरिकीर्तन होणार आसून,यासोबत हरियाणा (दिल्ली) येथील ३० साधूसंत दर्शनासाठी व हा अभूतपूर्व सोहळा पाहण्यासाठी येत आहेत.पाचपोर महाराज यांचे किर्तन झाल्यानंतर महाप्रसादाचा व भोजनाचा कार्यक्रम होईल, व दु.१ ते ४ वाजेपर्यंत मोफत शिबीर होणार असून पंचक्रोशीतील आलेल्या सर्व भाविक भक्तांनी याची नोंद घ्यावी व लाभ घ्यावा.या कलशरोहनाच्या कार्यक्रमासाठी विविध क्षेत्रातील प्रमुख मान्यवर उपस्थित राहणार आहेत. पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी मोठ्यां संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन रोकड्याआई मंदिर समिती व पिंपळगाव घाट वाडवाणा, मानेवाडी रुईगव्हाण-माळेवाडी येथील ग्रामस्थांच्या वतीने करण्यात येत आहे.

संपादकीय

## अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत २०४७ चे स्वप्न साकार करण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग सज्ज आहे. कुशल मनुष्यबळ हे देशाच्या विकासात मोठे योगदान देत असते. सर्वांना व्यावहारिक आणि दर्जेदार शिक्षण देणे, देशातील उद्योग तसेच आवश्यक त्या क्षेत्राला अनुसरून गरजेनुसार तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण प्रणाली विकसित करणे, युवक-युवतींचे विकसित माहिती तंत्रज्ञानासह ज्ञान अद्ययावत करणे, काळाच्या मागणीनुसार शिक्षण धोरण तयार करणे, केंद्र आणि राज्य शासनाच्या कौशल्य विकास विभागांतर्गत येणाऱ्या सर्व योजना तसेच शासनाच्या इतर विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कौशल्य विकासाच्या योजना राज्य शासन प्रभावीपणे राबवत आहे. याचाच एक भाग म्हणून अल्पमुदतीच्या रोजगारक्षम अभ्यासक्रम कार्यक्रमाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लवकरच उद्घाटन करण्यात येणार आहे.

राज्यात कौशल्य विकासाच्या योजना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राबविल्या जात आहेत. राज्यातील युवक, युवतींना अधिकाधिक चांगल्या प्रशिक्षणानंतर रोजगार प्राप्त व्हावा यासाठी कौशल्य रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाचा पदभार घेतल्यापासून विविध निर्णय व योजना राज्यात सुरू करण्यात आल्या असून त्याची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे महाराष्ट्राला देशाचे कौशल्य केंद्र म्हणून विकसित करणे ध्येय आहे. आयटीआय हा एक उच्च कौशल्य गुणवत्ता ब्रँड म्हणून प्रस्थापित करून औद्योगिक आस्थापनांच्या सहयोगाने प्रशिक्षण व प्रशिक्षण सुविधा वाढविणे, प्रतिवर्षी पाच लाख युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे, स्थानिक पारंपरिक कौशल्य आधारित अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देणे, यासाठी राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या आनुषंगाने कौशल्य अभ्यासक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्यातील युवकांना कौशल्याधारित रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी एक महत्त्वाकांक्षी पाऊल उचलण्यात आले आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २,५०६ तुकड्यांच्या अल्पमुदतीच्या रोजगारक्षम अभ्यासक्रम कार्यक्रमाचे उद्घाटन लवकरच ऑनलाईनच्या माध्यमातून होणार आहे.

**प्रथम येणाऱ्यास प्रथम प्रवेश**

अल्पमुदतीच्या रोजगारक्षम अभ्यासक्रम कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे उमेदवारांना त्यांच्या आवडीचा अभ्यासक्रम निवडण्याचे स्वातंत्र्य मिळणार आहे. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्रवेश या तत्त्वावर प्रवेश प्रक्रिया राबवली जाणार असून, इच्छुक उमेदवारांना गावात किंवा शहरात जवळच्या प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रवेश घेता येईल.

या योजनेत जनतेलाही सक्रिय सहभागासाठी प्रोत्साहन दिले गेले आहे. नागरिक आपल्या परिसरात कोणते रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरू व्हावेत हे सुचवू शकतात आणि शासन त्यांच्या सूचनांचा अभ्यास करून त्या अभ्यासक्रमांचा देखील समावेश या योजनेत करणार आहे. यामुळे स्थानिक रोजगाराच्या गरजेनुसार प्रशिक्षण देण्यास मदत होईल. या उपक्रमांतर्गत तीन महिन्यांच्या कालावधीचे अल्पमुदतीचे प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात येणार आहेत. हे अभ्यासक्रम तरुणांना अल्पावधीत रोजगारक्षम बनविण्यासाठी तयार करण्यात आले असून, उद्योग आणि सेवा क्षेत्रातील मागणी लक्षात घेऊन त्यांचे विषय निश्चित करण्यात आले आहेत.

या कार्यक्रमांतर्गत कार्यक्रमाच्या उद्घाटनादिवशी प्रत्येक प्रशिक्षण केंद्रावर स्थानिक दोन हजार नागरिकांचा सहभाग अपेक्षित आहे. प्रशिक्षणार्थ्यांसोबत स्थानिक युवक, पालक आणि समाजातील विविध घटकांचा सहभाग सुनिश्चित करून या कार्यक्रमाला जनसहभागाचे रूप देण्यात येत आहे. अल्पमुदतीचे हे अभ्यासक्रम शिकविण्यासाठी राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच शासकीय तंत्रनिकेतनांमधील सेवानिवृत्त शिक्षकांना सहभागी करून घेण्यात येणार आहे. हे शिक्षक आपले अनुभव, ज्ञान आणि तांत्रिक कौशल्य समाजासाठी वापरणार असून, सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून शासनाच्या या उपक्रमात योगदान देतील. यामुळे प्रशिक्षणाची गुणवत्ता वाढेल आणि विद्यार्थ्यांना अनुभवी प्रशिक्षकांचे मार्गदर्शन मिळेल.

या योजनेमुळे ग्रामीण आणि शहरी भागातील तरुणांना एकसमान संधी मिळणार आहे. स्थानिक केंद्रांमधूनच हे प्रशिक्षण उपलब्ध असल्यामुळे प्रवासाचा अडथळा दूर होईल. तसेच महिला उमेदवार, स्वयंरोजगार इच्छुक युवक आणि नव्या तंत्रज्ञान क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्यांसाठी हे अभ्यासक्रम अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. या उपक्रमाचा उद्देश फक्त प्रशिक्षण देणे नसून, राज्यभरात कौशल्य विकासाची नवी चळवळ उभी करणे हा आहे. शासन, उद्योग, शिक्षक आणि नागरिक यांच्या एकत्रित प्रयत्नातून रोजगारक्षम महाराष्ट्र घडविण्याचा संकल्प या योजनेतून पुढे येत आहे.

**आयटीआयचा सर्वांगीण विकास**

राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा (आयटीआय) दर्जा उंचावण्यासाठी आणि त्यांना उद्योग जगताशी अधिक सक्षमपणे जोडण्यासाठी संस्था व्यवस्थापन समित्यांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक सुधारणा सुरू आहेत. या सर्व उपक्रमासाठी संस्था व्यवस्थापन समिती प्रशिक्षक देणार आहेत. तसेच ही समिती प्रमुख म्हणून व्यवस्थापन करणार आहे. तेच मेंटर प्रशिक्षक निवडणार. अभ्यासक्रमसुद्धा स्थानिक परिस्थितीत व गरजेनुसार निवडले जाणार आहे. या समित्यांमध्ये स्थानिक उद्योग प्रतिनिधी, शैक्षणिक तज्ज्ञ, प्रशिक्षण अधिकारी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी सहभागी असतात. समितीमार्फत प्रत्येक संस्थेच्या गरजेनुसार प्रशिक्षणाचा दर्जा, पायाभूत सुविधा, उपकरणांचे आधुनिकीकरण आणि अभ्यासक्रमांची उद्योगाभिमुख पुनर्रचना यावर भर दिला जात आहे.

राज्य शासनाने यासाठी संस्थात्मक स्वायत्तता आणि उत्तरदायित्व या तत्त्वावर आधारित धोरण राबवले असून, प्रत्येक आयटीआयला स्थानिक उद्योगांसोबत सामंजस्य करार करण्यास प्रोत्साहन दिले जात आहे. या माध्यमातून संस्थांना आधुनिक उपकरणे आणि प्रयोगशाळा विकसित करणे, प्रशिक्षकांसाठी कौशल्यवर्धन कार्यशाळा आयोजित करणे, विद्यार्थ्यांसाठी उद्योगांतील ऑन-द-जॉब ट्रेनिंग आणि प्रेंटशीप संधी निर्माण करणे, तसेच संस्थेच्या परिसरात स्मार्ट क्लासरूम, डिजिटल लर्निंग लॅब्स आणि ग्रीन कॅम्पस संकल्पना राबविणे, असे विविध उपक्रम हाती घेण्यात येत आहेत.संस्था व्यवस्थापन समितीमार्फत प्रत्येक आयटीआयचे वार्षिक कार्य योजनानुसार पुनरावलोकन केले जाते. त्यात विद्यार्थ्यांची उपस्थिती, प्रशिक्षणाची गुणवत्ता, परीक्षेतील निकाल आणि उद्योगांत नोकरी मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण यांचा नियमित आढावा घेतला जातो. या प्रयत्नांमुळे औद्योगिक प्रशिक्षण संस्था आता केवळ पारंपरिक व्यवसाय शिक्षणापुरत्या मर्यादित न राहता, आधुनिक तंत्रज्ञान, नावीन्य आणि उद्योजकता केंद्र म्हणून विकसित होत आहेत.

# 'पत्रकार देवेंद्र ढाका' यांना बीड शहर बचाव मंचाची सांत्वन भेट

## सर्व पत्रकार संपादक बांधवांनी ढाका कुटुंबाची' साथ द्यावी बीड शहर बचाव मंच कायम 'ढाका' परिवाराच्या सोबतच

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील गजबजलेले ठिकाण असलेल्या माने कॉम्प्लेक्स परिसरामध्ये दिनांक २५ सप्टेंबर २०२५ रोजी 'यश देवेंद्र ढाका' यांची निर्घृण हत्या करण्यात आली.या हत्येच्या नंतर आज अकरा दिवस उलटून गेली आहेत तरीही मुख्य सूत्रधार अद्यापही पोलिसांच्या अटकेत येत का नाही ? याचे कारण पोलिसांकडून अजूनही स्पष्ट होत नाही. मुख्य सूत्रधाराला अटक करण्यात अद्यापही पोलीस अपयशी का आहेत याचेही कारण स्पष्ट व्हायला तयार नाही. कुटुंबीयांना अद्यापही न्याय मिळत नाही याच पार्श्वभूमीवर बीड शहर बचाव मंचाच्यावतीने देवेंद्र ढाका यांच्या परिवाराची सांत्वन पर भेट घेण्यात आली. यावेळी सांत्वनपर भेटी दरम्यान बचाव मंचचे निमंत्रक- अध्यक्ष नितीन जायभाये यांनी देवेंद्र ढाका यांना असा विश्वास दिला की आम्ही कायम तुमच्या सोबत आहोत. पोलीस प्रशासनाकडूनही दबाव तंत्राचा वापर



करण्यात येत असल्याचाही यावेळी कुटुंबाच्या वतीने वारंवार खंत व्यक्त करण्यात आली.पत्रकारांच्या परिवारावर जर अशी वेळ येत असेल तर सर्वसामान्य नागरिकांचे हाल याच्याहूनही वाइट होऊ शकतात. सर्व जनतेने जागृत होऊन सावध होण्याची गरज आहे, अशी वेळ आता कोणावरही येऊ शकते यात तीळ मात्र शंका नाही. त्यामुळे सर्व पत्रकार बांधवांनी एकत्र येऊन ढाका कुटुंबीयांची साथ द्यावी व तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात यावे अशी यावेळी सर्वांच्या वतीने अपेक्षा व्यक्त करण्यात आली. पोलीस अधीक्षक, पोलीस महासंचालक,पालकमंत्री गृहमंत्री/ मुख्यमंत्री यांनाही निवेदने देऊन प्रकरणाची गंभीर अशी दखल घेण्यास भाग पाडून लवकरात लवकर मुख्य आरोपी पकडण्यात यावा अशी मागणी करणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. पोलीस प्रशासनाने यामध्ये कुठलाही दबाव न बाळगता काम करावे व गुन्हेगारांना योग्य ते शासन होण्यापर्यंत पोहोचवावे अशी अपेक्षा सर्व जनतेच्या वतीने होत आहे. यावेळी बीड शहर बचाव मंचाच्या वतीने मार्गदर्शक प्राचार्य कॉम्रेड डी.जी तांदळे सर, अध्यक्ष कॉ.नितिन जायभाये,आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अशोकराव येडे, मंचाचे सल्लागार ड.अनिल बारगजे, इंटक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रामधन जमाले, राष्ट्रवादी काँग्रेस श.प. गटाच्या मीनाक्षीताई देवकते, लाडकी लेक अभियान चे समन्वयक बाजीराव ढाकणे, भाजपा शहर उपाध्यक्ष प्रीत आनंद कुकडेजा, भाजपा महिला ओबीसी जिल्हाध्यक्ष लताताई राऊत, पत्रकार संपादक नितेश उपाध्याय, श्रीराम कुरे सर, कपिल सौदा मुक्त पत्रकार ज्योत्स्नाताई चव्हाण,पत्रकार गणेश शिंदे, अशोक वाघमारे तसेच परिसरातील रहिवाशी 'कै. राम फाटले' यांचे वडील दिलीप फटाले, बंधू लखन फटाले व मुलगा सुजल फटाले हे देखील परिसरातील मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या नागरिकांच्या समवेत उपस्थित होते.

# नारायणदादांमुळे सर्वसामान्य कुटुंबातील मुले मोठ्या पदावर-मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी

## कृतज्ञता सोहळयात प्राचार्य मधुकर गायकवाड यांचा गौरव

## आ.चव्हाण,आ.काळे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या निर्मितीसोबतच स्थापन झालेल्या खेड्यातील शाळांनी ग्रामविकासात मोठे योगदान दिले. स्व नारायणदादा काळदाते यांच्या मुळेच ग्रामीण भागातील कष्टकरी , बहुजन समाजातील मुले मोठ्या पदावर पोहोचू शकली, असे गौरवोद्गार मा. कुलगुरू डॉ.विजय फुलारी यांनी काढले

माजी कुलगुरु, प्राचार्य मधुकरराव गायकवाड यांच्यावतीने रविवारी (दि.पाच ) बनसारोळा येथील महाराष्ट्र विद्यालयाच्या प्रांगणात कृतज्ञता सोहळयाचे आयोजन करण्यात आले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.विजय फुलारी अध्यक्षस्थानी होते. या कार्यक्रमास पदवीधर आमदार मा.सतीश चव्हाण, शिक्षक आमदार विक्रम काळे, माजी आ.वैजनाथ शिंदे, यांच्यासह माजी कुलगुरु डॉ.एन.व्ही.कल्याणकर (गडचिरोली), डॉ.देवानंद शिंदे (कोल्हापूर), माजी बिसीयुडी संचालक डॉ. भागवतराव कटारे, प्रकूलगुरु डॉ. वाल्मिक सरवदे,



संचालक ज्ञानेश्वर काळदाते, बनेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.नरेंद्र काळे, अध्यक्ष भागवतराव गोरे, प्राचार्य डॉ .बाबासाहेब गोरे, अनिलपंत कुलकर्णी यांची मंचावर उपस्थिती होती . प्रारंभी संस्थेच्या वतीने मंगलाताई व प्राचार्य मधुकर गायकवाड यांचा पाहुण्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ.विजय फुलारी म्हणाले, कोणत्याही क्षेत्रात नावलौकिक मिळवायचा असेल तर पारंपरिक शिक्षणासोबतच व्यावहारिकता, शहाणपणाची जोड असायला हवी. प्राचार्य मधुकर गायकवाड यांनी नारायण दादांचा समाजसेवेचे काम पुढे नेले. स्व वसंतराव काळे यांची मोठे योगदान त्यांच्या जडणघडणीत आहे. गायकवाड सरांसारखाच सर्वांना सोबत घेऊन पुढे गेले पाहिजे, असेही कुलगुरू डॉ . विजय फुलारी म्हणाले.

अन्न, वस्त्र, निवारा अन् शिक्षण या चारही गोष्टी देणाऱ्यांबद्दल कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले, असे प्राचार्य मधुकरराव गायकवाड म्हणाले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या माजी कार्यकारिणी सदस्य तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु म्हणूनही प्राचार्य गायकवाड यांनी काम उत्तम काम केले, असे आ. सतीश चव्हाण म्हणाले. माती आणि माता यांचे ऋण फेडण्याचा उपक्रम म्हणजे हा कार्यक्रम आहे, असे आ. विक्रम काळे म्हणाले. कार्यक्रमाच्या आयोजनामागची भूमिका डॉ.नरेंद्र काळे यांनी मांडली. ग्रामीण भागातील शाळा वाचवण्याची गरज आज निर्माण झाली आहे, असे ते म्हणाले. नारायणदादा काळदाते आणि वसंतराव काळे यांच्यामुळे गायकवाड सरांसह मान्यवरांची जडणघडण झाल्याचा गौरवही डॉ. काळे यांनी केला. यावेळी डॉ.नयना गायकवाड, डॉ. वाल्मिक सरवदे, डॉ. देवानंद शिंदे, डॉ. एन व्ही कल्याणकर, वैजनाथ शिंदे, ज्ञानेश्वर काळदाते यांनी मनोगत व्यक्त केले.

डॉ.संजय शिंदे यांनी सन्मान पत्राचे वाचन केले.डॉ.अनुजा जाधव, प्रा. दादासाहेब लोंढे यांनी सूत्रसंचालन तर डॉ. सुषमा जाधव यांनी आभार मानले. प्रारंभी पाहुण्यांचे स्वागत प्रा .निळकंठ, बाळासाहेब, विजय, उदय, अमोल , सुध्दा व भगवान गायकवाड यांनी केले.

# आदित्य दादा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त ५३९ वृक्षारोपणाचा संकल्प केला पूर्ण

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

माऊली विद्यापीठ शैक्षणिक संकुलामध्ये केज नगरीचे माजी नगराध्यक्ष,काँग्रेस कमिटी चे प्रदेश सरचिटणीस,तथा माऊली विद्यापीठ केजचे सचिव श्री.आदित्य दादा पाटील यांच्या ३९ व्या वाढदिवसानिमित्तमाऊली विद्यापीठ शैक्षणिक संकुल परिसरात आज ५३९ वृक्षारोपणाचा संकल्प विविध विद्या शाखा प्रमुखांच्या उपस्थित पूर्ण झाला.

माऊली विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी प्रताप मोरे यांच्या नियोजनातून विविध ठिकाणी कार्यक्रम घेण्यात आले.वृक्षारोपण उपक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक धनंजय खोसे,सरस्वती महा विद्यालयाचे प्राचार्य डॉ गौतम पाटील,भाऊसाहेब पाटील अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य विजयकुमार



शिनगारे, रामराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे एकनाथ गोरे, सरस्वती कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका सविता घुले,आदर्श प्राथमिक शाळेचे विलास भिसे, सरस्वती प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नितीन रसाळ यांसह शिक्षक कर्मचाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले

यावेळी प्रमुख मान्यवरांच्या हस्तेमाऊली विद्यापीठ शैक्षणिक संकुलामध्ये वृक्षारोपण करण्यात आले व प्रत्येक वृक्षाचे पालकत्व सर्वांनी घेतले.यावेळी डॉ.हनुमंत सौदागर बोलतानाम्हणाले की,सचिव आदित्य दादा पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण संकुलात सर्व भौतिक सुविधा उपलब्ध करून दिल्या.यावर्षी सर्वत्र ओला दुष्काळ असल्याने वाढदिवसा निमित्त केवळ समाज उपयोगी उपक्रम घ्यावेत अशा सूचना दिल्यानेच यावर्षी वृक्षारोपण करण्यात आले.पुढे ते म्हणाले पर्यावरण हे संबंध मानव जातीसाठी समृद्ध असणे काळाची गरज आहे व भविष्याची ती मागणी आहे यासाठी आपण सर्वांनी पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.या वृक्षारोपण कार्यक्रमास माऊली विद्यापीठ परिवारातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

## शहादा तालुक्यातील चिखली येथील नाईक परिवारानीं आजही टिकवली जहागीरदार परंपरा

**दैनिक वादळ वार्ता**
**बोरद । मंगेश पाटील**

शहादा शहरापासून सुमारे १२ किलोमीटर अंतरावरील आदिवासी लोक वस्तीने वसलेले चिखली म्हणून गावाची ओळख आहे.इ.स.१८०० पासून या जहागीरदार परिवाराची ऐतिहासिक वारसा आजही कायम ठेवण्यात आला आहे, याबाबत अधिक माहिती अशी की चिखली येथील जागीरदार परिवारातील लखाजी नाईक यांच्या पासून दसरा निमित्त चालत आलेली परंपरा आजही सुरु.सन १८०० ते १८१२ इस्ट इंडिया कंपनी विरोधात लढणारे झुंजार नाईक आद्य क्रांतिकारी होते.महाराज यशवंतराव होळकर यांच्या कारकिर्दीत जेष्ठ व प्रथम सहकारी म्हणून काम पाहत होते.पुढे जाऊन बटेसिंग सरकार नाईक यांनी जहागीर स्थापन केली.नाईक परिवार हे १५०० एकराचे जहागीदार होते.त्यांना आदिवासीचे कैवारी म्हणून ओळखले जात असे. त्यांच्यानंतर सुमेरसिंग नाईक, चंद्रसिंग नाईक यांनी जहागीदार परंपरा नुसार जहागीदारी सांभाळली. तीच परंपरा राखत दर वर्षातून दसराच्या दिवशी आजही चिखली येथे समस्त नाईक जहागीरदार परिवार एकत्र येऊन या दिवशी गावं अतर्गत नऊ ग्रहाची विधी प्रमाणे पूर्वजानी नेमलेले पुजारी परिवारा मार्फत पूजा केली जाते.गावातील हनुमान मंदिरात होम यज्ञ करतात.याच दिवशी समस्त जहागीरदार परिवारातील भाऊबंध एकत्र येत राजगादी व शस्त्र पूजा करतात व संध्याकाळी चार वाजता समाप्ती करतात.नंतर सर्व नाईक जागीरदार परिवार एकमेकांच्या भेटीगाठी करून उपस्थित जेष्ठानकडून जहागीरदार परिवाराचा इतिहास सांगण्यात येतो जेणेकरून पुढच्या पिढीला जागीरदार परिवाराच्या रूढीपरंपरा चालत राहतील. सदरील नाईक जागीरदार परिवार हे पश्चिम खानदेशातील सर्वात मोठे संस्थान काठी इस्टेट, रायसिंगपूर,



सिंगपूर, नाला, गगठा,सागबारा, चौपळवाहू,अली सोजडान, चिखली या विविध ठिकाणी जहागीदार परिवार आहेत.त्या काळामध्ये इंग्रजांविरुद्ध लढत असताना मल्हारराव होळकर यांना झुंजार नाईक यांनी खूप मोठी मदत केली होती, त्यावेळेस त्यांनी चिखली जहागिरी नाईक परिवारास बहल केली होती, म्हणजेच अठराशे एकर जमीन या परिवाराला देण्यात आली होती, इतिहासात जहागीरदार परिवार प्रजाच्या संकटाच्या वेळी राजा नेहमीच मदत करत असे,तीच परंपरा राखत आजही नाईक जहागीरदार परिवार परिसरातील नागरिकांच्या मदतीला धावून येतात. यापुढील वारसा जहागीरदार परिवारातील वारसदार चंद्रसिंग नाईक, मोहनसिंग नाईक प्रतापसिगनाईक, यांच्या मार्गदर्शनाखाली पंचायत समिती शहादाचे माजी सभापती डॉ. सुरेश नाईक, कुवरसिंग, अमरसिंग, देवीसिंग नाईक, इंजिनियर महेंद्र नाईक, लखन नाईक, भीमसिग, संजय नाईक, मनोज नाईक, झुंजार नाईक, हे सांभाळत आहेत. चिखली येथील नाईक जहागीरदार परिवाराचा इतिहासात पराक्रमी कार्याची नोंद आहे.

# वृद्धत्वकालीन एकाकीपणा दूर करण्यासाठी छंद आणि सकारात्मक दृष्टिकोनाची गरज–डॉ.राजेंद्र बगाटे

**दैनिक वादळ वार्ता । नाशिक । प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन आणि सेवांतर्गत प्रशिक्षण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने १ ऑक्टोबर रोजी साजऱ्या होणाऱ्या 'आंतरराष्ट्रीय वृद्धत्व दिनानिमित्त' विशेष संवाद कार्यक्रम वृद्धत्व–एक सिंहावलोकन : समस्या व उपाय या विषयावर यशवाणी वेब रेडिओवर आयोजित करण्यात आला होता. मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे आणि प्र–कुलगुरू प्रा. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या कल्पक मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या १४ व्या पुष्प परिसंवादात समाजशास्त्राचे आणि वृद्धत्वशास्त्राचे अभ्यासक डॉ. राजेंद्र बगाटे यांनी वृद्धत्त्वाचे सामाजिक, सांस्कृतिक, मानसशास्त्रीय आणि जीवशास्त्रीय पैलू सखोलपणे मांडले.

डॉ. राजेंद्र बगाटे यांनी आपल्या संवादात सांगितले की, वृद्धत्व ही केवळ जैविक प्रक्रिया नसून जीवनातील अनुभव, ज्ञान आणि संयमाचा साठा आहे. भारताच्या संविधानानुसार ६० वर्षांवरील व्यक्ती 'ज्येष्ठ नागरिक' म्हणून ओळखल्या जातात. या काळात शरीरातील पेशींची पुनर्निर्मिती मंदावते, हाडांची व स्नायूंची ताकद घटते, आणि ज्ञानेंद्रियांची कार्यक्षमता कमी होते; पण त्याचवेळी भावनिक परिपक्वता, सहिष्णुता आणि शहाणपणा वाढतो. या गुणांचा समाजहितासाठी उपयोग झाला पाहिजे. डॉ. बगाटे पुढे म्हणाले की, वृद्धत्वाच्या काळात सामाजिक, आर्थिक आणि मानसिक आधाराची गरज सर्वाधिक असते. संयुक्त कुटुंबपद्धतीच्या ऱ्हासामुळे आणि शहरीकरणामुळे वृद्ध एकाकी पडले आहेत. त्यामुळे त्यांनी 'मी मी'च्या कवचातून बाहेर येऊन छंद जोपासावेत, समाजाशी संवाद वाढवावा, आणि सक्रिय जीवन जगावे. छंद जोपासल्याने मानसिक ताजेपणा टिकतो व आत्मसन्मान वाढतो.

डॉ. राजेंद्र बगाटे यांनी पुढे अधोरेखित केले की, रोगप्रतिकारक शक्ती कमी झाल्यामुळे वृद्धांनी संतुलित आहार, नियमित विहार, आणि तणावरहित जीवनशैली स्वीकारावी. सामाजिक बदल, आर्थिक आव्हाने आणि पर्यावरणीय अस्थिरतेला सकारात्मकतेने सामोरे जाणे आवश्यक आहे. स्वावलंबन ही वृद्धांच्या आत्मसन्मानाची गुरुकिल्ली आहे. डॉ. बगाटे म्हणाले की, वृद्धांनी स्वतःची ओळख निष्क्रियतेत नव्हे तर साक्रीयतेत शोधली पाहिजे. आरोग्याविषयी जागरूकता, सामाजिक सहभाग, नव्या तंत्रज्ञानाचे ज्ञान, संवादकौशल्य आणि सतत शिकण्याची वृत्ती या गोष्टी वृद्धत्व अधिक अर्थपूर्ण करू शकतात. या संवादाद्वारे वृद्धत्वाचे समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय, आर्थिक आणि सांस्कृतिक पैलू स्पष्ट करण्यात आले. वृद्धांच्या समस्या समजून घेऊन त्यांच्या सन्मानाचे आणि स्वावलंबनाचे धोरणात्मक प्रयत्न गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले. वृद्धांच्या समस्यांविषयी संवेदनशीलता निर्माण करण्याचा आणि समाजात सकारात्मक दृष्टिकोन वाढविण्याचा हा उपक्रम ठरला आहे.

कार्यक्रमाचे संयोजन आणि निवेदन अध्यासन प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी केले. त्यांनी या संवाद मालिकेचे उद्दिष्ट आणि महत्त्व स्पष्ट केले. या परिसंवादाच्या यशस्वी आयोजनात श्री. राहुल पगारे यांनी विशेष परिश्रम घेतले, तर दृक्–श्राव्य केंद्राचे प्रमुख प्रा. जदीप निकम यांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक सहाय्यक श्री. गिरीश गवळी आणि श्री. प्रकाश सापनर यांनी तांत्रिक सहकार्य केले. हा संवाद यशवाणी वेब रेडिओच्या पोर्टलवर अध्ययनार्थी व श्रोत्यांसाठी कायमस्वरूपी श्रवणासाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे.



# अंबाजोगाई नर्सिंग कॉलेजमध्ये बाबासाहेबांच्या विचारांचा अपमान

## शिष्यवृत्ती गैरप्रकार; विद्यार्थी नेत्याची तक्रार

**दैनिक वादळ वार्ता । अंबाजोगाई । प्रतिनिधी**

दीप्ती अहिरे नर्सिंग कॉलेजमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या छायाचित्राच्या वरचे बाजूस देवी–देवतांचे फोटो लावले असल्यामुळे संभ्रम निर्माण झाला असून, प्राचार्यांनी तक्रारकर्त्यांना उद्धट भाषेत उत्तर दिल्याची घटना समोर आली आहे. याशिवाय, मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम कॉलेज प्रशासन हडप करत असल्याची गंभीर शंका निर्माण होत आहे. सम्यक विद्यार्थी आंदोलन महाराष्ट्र राज्याचे पुणे जिल्हा निरीक्षक इंजि. अक्षय गोटेगावकर यांनी या प्रकरणाची माहिती वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा अध्यक्ष मा. शैलेश भाऊ कांबळे यांना पत्राद्वारे दिली आहे. तसेच बीड जिल्हा अधिकारी व बीड जिल्हा पोलीस अधीक्षक साहेब यांच्याकडे ही मेल द्वारे तक्रार केली आहे.कॉलेजच्या चौथ्या मजल्यावरील प्राचार्य कक्षात बाबासाहेबांच्या छायाचित्राच्या वर देवी–देवतांचे फोटो लावलेले असल्याचे गोटेगावकर यांनी



निदर्शनास आणले. बाबासाहेबांनी देवी–देवता नाकारून बौद्ध धम्माचा विज्ञानवादी मार्ग दाखवला असल्याने हा प्रकार त्यांच्या विचारांचा अपमान करणारा आहे, असे ते म्हणाले. प्राचार्य सूर्यवंशी ( मोबाईल नंबर +९१९५११००५२००) यांना याबाबत सूचना दिली असता, त्यांनी बाबासाहेबांबद्दल किती भक्ती आहे हे तुम्ही सांगण्याची गरज नाही अशी उद्धट भाषा वापरली आणि फोटो कुठे लावायचे हे आम्ही ठरवू असे उत्तर दिले.याशिवाय, जाणीवपूर्वक प्रॅक्टिकल मध्ये नापास केले जाते , कॉलेजमध्ये मागासवर्गीय मुलींच्या शिष्यवृत्तीची पूर्ण रक्कम विद्यार्थ्यांना कॉलेज फी भरण्यास भाग पाडली जाते. शासनाकडून मिळणारी शिष्यवृत्ती कॉलेज प्रशासनाकडून हडपली जात असल्याची शंका आहे. शिष्यवृत्ती वेळेवर जमा न होणे किंवा नाकारली जाणे यामुळे विद्यार्थ्यांच्या रजिस्ट्रेशन प्रक्रियेत विलंब होत असून, कागदपत्रे जाणीवपूर्वक अडवली जात आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना मानसिक आणि शैक्षणिक त्रास सहन करावा लागत आहे.माहिती अधिकार कार्यकर्ते तसेच सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे पुणे जिल्हा निरीक्षक श्री अक्षय गोटेगावकर यांनी पत्रात मागणी केली आहे की, प्राचार्य कक्षातील छायाचित्र व्यवस्था सुधारली जावी, शिष्यवृत्तीचा योग्य विनियोग आणि पारदर्शकता सुनिश्चित करावी, विद्यार्थ्यांना कागदपत्रे त्वरित उपलब्ध करून द्यावीत आणि गैरप्रकारांची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी.

# केज अतिरिक्त सत्र न्यायालय इमारतीच्या दुसऱ्या मजल्याला मंजुरी

## पावणे आठ कोटींचानिधी मंजूर

## आ.मुंदडा यांच्या पाठपुराव्याला यश

**दैनिक वादळ वार्ता । केज । प्रतिनिधी**



वाढत्या न्यायालयीन कामकाजामुळे जागेची कमतरता भासत असलेल्या केज येथील अतिरिक्त सत्र न्यायालया च्या इमारतीवर दुसरा मजला बांधण्यास शासनाने अखेर मंजुरी दिली आहे.आ. नमिता मुंदडा यांनी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता.त्यांच्या प्रयत्नांना यश मिळून रु. ७ कोटी ७६ लाख ५० हजारांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.विधी व न्याय विभागाच्या दि.६ ऑक्टोबर रोजी जारी आदेशानुसार, हे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखाली करण्यात येणार आहे.आ.मुंदडा यांनी न्यायालयाच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन शासन दरबारी वारंवार ही मागणीमांडली होती. या मंजुरीमुळे केज तालुक्यातील न्याय व्यवस्थेसाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांचा विकास होणार असून,नागरिकांसाठी अधिक सुटसुटीत आणि सुविधा–संपन्न व्यवस्था उपलब्ध होणार आहे.या कामासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उप मुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री पंकजा मुंडे यांचे आमदार नमिता मुंदडा यांनी आभारमानले आहेत

## इंग्रजी व आयटीचे ज्ञानच विद्यार्थ्यांचे भवितव्य ठरवते

# तुलसी महाविद्यालयातील पालक सभेत प्रा नितीन काळे यांचे प्रेरणादायी विचार

**दैनिक वादळ वार्ता । बीड । प्रतिनिधी**




आजच्या काळात विद्यार्थ्यांनी आयटी कौशल्य आत्मसात करणे अत्यंत गरजेचे आहे. योग्य डिग्री, कंप्युटर ज्ञान, कामाचा अनुभव आणि इंग्रजीवर प्रभुत्व असल्यासच चांगल्या नोकऱ्या मिळू शकतात, असे मत प्रा.नितीन काळे यांनी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे दि.४ ऑक्टोबर रोजी झालेल्या पालक मेळाव्यात सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. प्रदीप रोडे यांनी भूषवले, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.अर्जुन राठोड, प्राचार्य प्रा.डी.जी. निकाळजे, प्राचार्य डॉ.विजयकुमार बांदल, प्राचार्य प्रा. डी.डी. राऊत उपस्थित होते.

प्रा. प्रदीप रोडे म्हणाले की, बदल हा निसर्गाचा नियम आहे. जो बदल स्वीकारत नाही, तो काळाच्या पडद्याआड जातो. चांगल्या गोष्टी शिकवाव्या लागतात, पण वाईट गोष्टी आपोआप शिकल्या जातात. आयुष्यभर आनंदाने जगायचे असेल तर फक्त तीन वर्ष कठोर मेहनत घ्या.

प्रा.अर्जुन राठोड यांनी उपस्थित पालक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत सांगितले, वेळ आणि संधी कोणासाठीही थांबत नाहीत. मोबाईल आणि व्यर्थ गोष्टींचा दुरुपयोग टाळून वेळेचा योग्य उपयोग केल्यास यशस्वी होणे शक्य आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य प्रा. डी.जी. निकाळजे यांनी केले आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक तसेच सामाजिक प्रगतीसाठी पालक–शिक्षक संवादाची गरज अधोरेखित केली. डॉ. विकास वाघमारे यांनी महाविद्यालयातील विविध उपक्रमांची माहिती पीपीटीद्वारे सादर केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. योगिता लांडगे यांनी केले तर आभार प्रा.किशोर वाघमारे यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दसरा व धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त माजी नगराध्यक्ष दीपक नाना देशमुख यांचा सर्वपक्षीय स्नेहमेळावा

## आपुलकीचे सोनं' देत स्नेह व एकात्मतेचा संदेश

### धम्मचक्र परिवर्तन दिन ऐक्य, शांती आणि नैतिक मूल्यांची जोपासणारा करणारा उत्सव

**दैनिक वादळ वार्ता । परळी । प्रतिनिधी**



दसरा व धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त परळीचे माजी नगराध्यक्ष दीपक नाना देशमुख यांनी दिल्या सर्वपक्षीय नेते पदाधिकारी व कार्यकर्त्यांना शुभेच्छानैतिकता आणि स्नेह यांचा उत्सव म्हणून साजरा केला जातो. हा सण दुष्टावर धर्माचे, अन्यायावर न्यायाचे, अज्ञानावर ज्ञानाचे विजयाचे प्रतीक मानला जातो. तर धम्मचक्र परिवर्तन दिन हे सामाजिक समता, बौद्ध तत्त्वज्ञान आणि धर्मनिरपेक्षतेचा संदेश देणारे पर्व आहे हा दिवस समाजात ऐक्य, शांती आणि नैतिक मूल्यांची जाणीव वाढवण्यासाठी साजरा केला जातो.याच पार्श्वभूमीवर परळीचे माजी नगराध्यक्ष दीपक नाना देशमुख यांनी सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी घेत आपुलकीचा सेतू मजबूत केला.आपुलकीचे सोनं देऊन स्नेह वृद्धिंगत व्हावा, अशी भावना त्यांनी व्यक्त करत सर्व पक्षांतील मान्यवरांना 'विचारांचे सोनं' भेट देत शुभेच्छा दिल्या.परळीतील कालरात्री देवी मंदिर शेजारी उत्साहात पार पडलेल्या दसरा मेळाव्यात सर्व पक्षांचे पेंडॉल उभारण्यात आले होते. या ठिकाणी भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, काँग्रेस, वंचित, मनसेसह विविध पक्षांचे प्रमुख नेते व पदाधिकारी उपस्थित होते.दीपक नाना देशमुख यांनी प्रत्येकाशी आपुलकीने संवाद साधत विचारभिन्नता असली तरी समाजहितासाठी सर्वांनी एकत्र यावे असा मनोगतपूर्ण संदेश दिला.दसऱ्याच्या व धम्मचक्र परिवर्तन दिनाच्या शुभमुहूर्तावर परळीच्या राजकारणात स्नेह, सौहार्द आणि एकात्मतेचे सोनं झळकले, असा अनुभव उपस्थित कार्यकर्त्यांनी व्यक्त केला

# शिक्षक लोकशाही ज अध्यक्षपदी धनराज शिंदे यांची बिनविरोध निवड

**दैनिक वादळ वार्ता । खापर । तुकाराम क्षीरसागर**

नंदुरबार जिल्हा माध्यमिक शिक्षक संघ व शिक्षक लोकशाही आघाडी मा.मुख्याध्यापक प्रभाकर नांद्रेसर व एन टी पाटील सर यांच्या मार्गदर्शना खाली दि.०४/१०/२०२५ शनिवार रोजी अक्कलकुवा शिक्षक लोकशाही आघाडी तालुका कार्यकारणीच्या पदाधिकाऱ्यांची निवड प्रक्रिया नुकतेच उत्साही वातावरणात पार पडली. संघटनेतील एक जूट दाखवत सर्व प्रमुख पदांवरील पदाधिकारीची बिनविरोध निवड करण्यात आली असून शिक्षक वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या निवडणुकीत (अक्कलकुवा) शिक्षक लोकशाही आघाडीच्या तालुका अध्यक्षपदी एकमताने माध्यमिक विद्यालय कोराई शाळेचे शिक्षक धनराज शिवदास शिंदे यांची निवड करण्यात आली तर उपाध्यक्षपदी दिनेश एम.पाटील व मनीषा भागवतराव चव्हाण तसेच तालुका कार्यकारणीत इतर प्रमुख पदाधिकारीची बिनविरोध निवड करण्यात आली.

न्यू इंग्लिश स्कूलचे मा. प्राचार्य बी ए पवार सर यांनी निरीक्षक म्हणून काम पहिले.अक्कलकुवा तालुका शिक्षक संघाचे माजी अध्यक्ष, तालुका कार्यकारणी निवड सभेचे अध्यक्ष संजय पाटील सर तसेच जिल्हा कार्यकारणीतील पदाधिकारी व्ही जी खैरनार सर, एल बी पाटील सर, .आर पी साळुंखे सर, न्यू इंग्लिश स्कूल अक्कलकुवाचे .उपमुख्याध्यापक इंगळे सर व तालुक्यातील माध्यमिक शाळेचे शिक्षक प्रतिनिधी उपस्थित होते. सर्व नवनिर्वाचित पदाधिकारी व कार्यकारणीतील सदस्यांचे अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाय बी चव्हाण सर यांनी केले तर आभार प्रदर्शन सुनील साठे सर यांनी केले.

# माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख व संध्या देशमुख यांच जनसंपर्क अभियानाला सुरुवात

## माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख व संध्या देशमुख यांच जनसंपर्क अभियानाला सुरुवात

**दैनिक वादळ वार्ता । परळी । प्रतिनिधी**

परळी नगर परिषदेचे नगराध्यक्ष पदाचे आरक्षण जाहीर होताच माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांनी जनसंपर्क अभियानाला सुरुवात केली आहे. सोबत त्यांच्या पत्नी संध्या देशमुख महिलांची टीम घेऊन मैदानात उतरले आहे. या अभियानाला उत्स्फूर्त असा प्रतिसाद महिला वर्गातून मिळत आहे.सप्तशृंगी दुर्गा उत्सवाच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबवत सर्वसामान्य लोकांचे प्रश्न



सोडवले आहेत. शहराच्या सर्वांनी विकासासाठी शासन दरबारी व नगरपालिकेच्या मार्फत पंतप्रधान आवास योजना, रमाई आवास योजना, विविध समाज उपयोगी उपक्रम,रुग्णवाहिका, लाडकी बहिण योजना, यासारख्या योजना यशस्वीपणे राबवल्या आहेत. त्याचा लाभही हजारो लोकांना मिळवून दिला आहे.परळी नगराध्यक्षपदाची निवडणूक काही महिन्यावर येऊन ठेपली आहे. आज नगराध्यक्षपदी खुल्या महिला प्रवर्गासाठी सुटले असल्याने त्यांनी परळी शहरातील जुन्या गावा भागात जनसंपर्क आभ्यानाला सुरुवात केली आहे. घरोघरी ते मतदानाची परडी घेऊन मताचा जोगवा मागत आहे. या अभिनव उपक्रमाला प्रचंड प्रमाणात महिला वर्गातून प्रतिसाद मिळत आहे.

# ना.पंकजाताई मुंडें चा सावरगाव घाट येथे दसरा मेळावा हा रेकॉर्ड ब्रेक गर्दीचा ठरला

# सुरज भैय्या घुले यांनी केली तीन हजार भाविकांसाठी केली भव्य भोजन व्यवस्था; येवता जिल्हा परिषद सर्कल मधून २०० गाड्यांचे नियोजन

**दैनिक वादळ वार्ता । केज । प्रतिनिधी**

येवता जिल्हा परिषद सर्कल मधून ना. पंकजाताई मुंडे यांच्या सावरगाव घाट येथील दसरा मेळाव्यासाठी यावर्षी भव्य नियोजन करण्यात आले.भगवान भक्ती गडावर दरवर्षी प्रमाणे यंदाही प्रचंड जनसागर उसळला होता. यामध्ये पहिल्यांदाच भाजपचे युवा नेते सुरज भैय्या घुले यांनी जवळ पास तीन हजार भाविकां साठी जेवणाची व्यवस्था करून वेगळाच ठसा उमटवला आहे.आपल्या सोबत असणाऱ्या कार्यकर्त्यां बरोबरच इतर भाविकांसाठीही त्यांनी उत्कृष्ट जेवणावळ उभी केली होती.तसेच यावेळी १५० ते २०० गाड्यांचे प्रभावी नियोजन करून भाविकांच्या ये-जा व्यवस्थेत मोठा दिलासा दिला.यंदाचा दसरा मेळावा हा रेकॉर्डब्रेक गर्दीचा ठरला.नेहमीच ना. पंकजाताई मुंडे च्या कार्या वर प्रचंड निष्ठा ठेवणारा चेहरा म्हणून सुरज भैय्या घुले पुढे येत आहेत. सातत्यपूर्ण सामाजिक व राजकीय उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग सुरज भैय्या घुले यांचा असतो संघटनात्मक टीमवर्क ही त्यांची कार्यशैलीलोकांच्या मनात घर करून राहिली आहे.आता हा तरुण पुढे कोणती संधी मिळवतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.





## अंबाजोगाई येथील पत्रकार प्रशांत मस्के यांचा समाजकार्यास प्रोत्साहन देऊन वाढदिवस उत्साहात साजरा

**दैनिक वादळ वार्ता**
**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

दैनिक बीडसत्ता वृत्तपत्र चे अंबाजोगाई तालुका प्रतिनिधी प्रशांत रघुनाथ मस्के यांच्या वाढदिवसा निमित्त विविध क्षेत्रातून शुभेच्छा पत्रकार प्रशांत रघुनाथ मस्के यांनी पत्रकारिता क्षेत्रामध्ये गेल्या सात वर्षांपासून निर्भीड अशी पत्रकारिता केली आहे आणि करत आहेत त्यांच्या लेखणीने दडलेले सत्य बाहेर काढून वाचा फोडण्याचे काम केले आहे त्यांनी पत्रकारिता क्षेत्रामध्ये उत्कृष्ट अशी पत्रकारिता करताना त्यांच्या निर्भीड पत्रकारिता कार्यामुळे त्यांना पद्मपाणी राज्य स्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्काराने गौरविण्यात सन्मानित करण्यात आले आहे.संघर्ष भूमी तालुका अंबाजोगाई येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त एक एप्रिल ते चौदा एप्रिल पर्यंत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ वा सार्वजनिक जयंती महोत्सव २०२५ संघर्ष भूमी वरील होणाऱ्या विविध कार्यक्रमाचे वृत्तांकन लोकप्रिय दै. बीडसत्ता वृत्तपत्रांमध्ये बातम्या प्रसिद्ध केल्या बद्दल पत्रकार प्रशांत रघुनाथ मस्के यांना संघर्ष भूमीच्या वतीने संविधान आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित केले आणि त्यांच्या निर्भीड आणि उत्कृष्ट पत्रकारितेबद्दल त्यांना त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या त्यांनी पत्रकारिता क्षेत्रामध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्या बद्दल त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने सर्वत्र क्षेत्रातून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.




## केज कळंब रोडवर पिकअप आणि कारची जोरदार धडक

### तीन जण गंभीर जखमी, साळेगाव– माळेगाव पुलावर अपघात केजचे पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत वाहतूक केली सुरळीत

**दैनिक वादळ वार्ता । केज । प्रतिनिधी**

दि.६ आक्टोबर रोजी दुपारी २ वाजण्याच्या दरम्यान केज– कळंब रोडवरील साळेगाव–माळेगाव मोहरील बाबा दर्गा पुलावर पिकअप क्रमांक MH38 E2231 आणि कार यांच्यात भीषण अपघात झाला. या अपघातात तीन गंभीर जखमी झाल्याची शक्यता असून जखमींना तत्काळ केज उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.सदरील घटनेची माहिती मिळताच केज पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे व त्यांचे सहकारी यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.त्यांनी अपघात स्थळावरील दोन्ही वाहने रस्त्याच्या बाजूला करून वाहतूक सुरळीत केली. कारला नंबर प्लेट नसल्यामुळे वाहन क्रमांक दिसला नाही,अशीमाहिती पोलिसांनी दिली आहे. अपघाताचे नेमके कारण समजू शकले नसून पुढील तपास केज पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली केज पोलिस करीत आहेत.



### संत दगा महाराजांच्या संकल्पनेतून शहाद्याच्या परी गावात ९० वा रामधून सोहळा उत्साहात संपन्न

# सात दिवस रामभक्तीत तल्लीन.संत दगा महाराजांच्या संकल्पनेतून शहाद्याच्या परी गावात ९० वा रामधून सोहळा उत्साहात संपन्न: सात दिवस रामभक्तीत तल्लीन

**दैनिक वादळ वार्ता । नंदुरबार । दिपक गोसावी**

नमस्कार. संत दगा महाराजांच्या १०८ संकल्पनांच्या मालिकेतला ९० वा रामधून सोहळा शहादा तालुक्यातील परी या गावात २ ऑक्टोबर २०२५ रोजी मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्यामुळे परिसरातील हजारो रामभक्त रामधूनच्या आध्यात्मिकतेत पूर्णपणे तल्लीन झाले होते.

दिनांक २४ सप्टेंबर २०२५ रोजी संत दगा महाराजांची पालखी तऱ्हाडी येथील रामभक्तांनी परी येथील रामभक्तांच्या स्वाधीन केली. तेव्हापासून पुढील सात दिवस परी गाव रामभक्तीत न्हाऊन निघाले. या काळात पहाटे ५ वाजता संपूर्ण गावात रामधूनची फेरी सुरू असे. रोज रात्री ८ वाजता एक खास रामधूनचा कार्यक्रम होत होता.

२ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री ८ ते ११ वाजेपर्यंत मुख्य सोहळा पार पडला. यावेळी परी गावातील प्रत्येक रामभक्त राम धूनमध्ये तल्लीन झाला होता.





परीसह परिसरातील सुमारे २००० पेक्षा जास्त रामभक्त यावेळी उपस्थित होते. यात कलसाडी, कलमाडी, जावदा, मोड, कार्थर्दे, पाडळदा, निझर, कोळदा, शिंदे, लोणखेडा, बोरद, तळवे,वर्दे वैजाली, आमलाड, बहुरूपा, लोणखेडा, कोरीट या गावांमधील रामभक्तांचा समावेश होता. या सोहळ्याला महिलांची उपस्थितीही लक्षणीय होती.

उपस्थित भक्तांना करजो आणि कराइले जो (म्हणजे चांगले काम स्वतः करा आणि इतरांना करायला लावा) या बापूंच्या संकल्पाला आपल्या आचरणात आणण्याचे आवाहन संत दगा महाराजांच्या भक्तांनी केले.

सोहळ्याची सांगता होताना परी येथील रामभक्तांनी संत दगा महाराजांची पालखी वर्दे येथील रामभक्तांच्या स्वाधीन केली. रामभक्तांना नाश्ता देऊन या सोहळ्याची समाप्ती झाली.अखंड भक्तीचा वसा: विशेष म्हणजे परी या गावात नेहमी रामायण, रामकथा, भागवत कथा, कीर्तन, भजन हे आध्यात्मिक कार्यक्रम सुरू असतात, ज्यामुळे या गावाने अखंड रामभक्तीचा वसा जपला आहे.

## राजर्षी शाहू विद्यामंदिर शाळेचा पालक मेळावा उत्साहात संपन्न

**दैनिक वादळ वार्ता । केज । प्रतिनिधी**

केज शहरातील स्वामी दयानंद प्रतिष्ठान केज संचलित राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेत दरवर्षीप्रमाणे पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय ड. राजेसाहेब देशमुख उर्फ पापा यांनी भूषविले तर प्रमुख पाहुणे म्हणून केज शहरातील ज्येष्ठ साहित्यिक तथा सेवानिवृत्त शिक्षक श्री.हनुमंत घाडगे यांची उपस्थिती होती.मंचावर संस्थेचे सचिव श्री.जी.बी. गदळे,सामाजिककार्यकर्ते प्रा.हनुमंत भोसले, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती बी.बी.चाटे यांची उपस्थिती होती.सर्वप्रथम आरक्षणाचे जनक राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.त्यानंतर उपस्थित पालकांनी आपल्या पाल्याच्या प्रगती बाबत सूचना व्यक्त केल्या. यामध्ये बहुतांश पालकांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.पालकांमधून दिलीप बनसोडे यांनी प्राथमिक स्वरूपात आपले मत मांडले. पालकांच्या सूचना बाबत संस्थेचे सचिव श्री.जी.बी. गदळे यांनी संस्थेच्या वतीने उत्तर दिले.उपस्थित हनुमंत घाडगे सर यांनी पालकांना विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत,अभ्यासा बाबत महत्त्वाच्या सूचना केल्या.महापुरुषांचे चरित्र वाचून आदर्श घ्या असे आवाहन त्यांनी यावेळी केले.श्री.हनुमंथ भोसले सर यांनीही उपस्थित पालकांना शाळेतील अभ्यास वेळेवर करणे याबाबतीत सूचना केल्या. अध्यक्षीय भाषणात ड.राजेसाहेब देशमुख यांनी शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी कायमच आग्रही असते,सर्व तळागाळातील मुलांना उत्तम शिक्षण मिळावे यासाठी आपण कार्यरत आहोत असे मत मांडले. एकंदरीत शाळेच्या प्रगती बाबत सर्व उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री.व्ही.बी.यादव यांनी तर प्रास्ताविक श्री.जी.बी. डीरंगे यांनी तर आभार प्रदर्शन श्री.जे.आर.मस्के यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री.ए.डी. देशमुख,श्री.आर.एस. क्षीरसागर,श्रीमती अनिता जाधव यांनी सहकार्य केले.पालक मेळाव्यास सर्व शिक्षक व पालक उपस्थित होते.




## नंदुरबार जिल्हयातील अतिवृष्टीग्रस्त भागाची पालकमंत्र्यांकडून पाहणी

### दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी प्रशासन सज्ज

**दैनिक वादळ वार्ता ।**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ मंत्री तसेच नंदुरबार जिल्ह्याचे पालकमंत्री ड. माणिकराव कोकाटे यांनी ४ ऑक्टोबर २०२५ रोजी अतिवृष्टीग्रस्त चौपाळे पंचक्रोशीतील भागांचा दौरा करून प्रत्यक्ष स्थितीचा आढावा घेतला. शेतकऱ्यांशी संवाद साधताना त्यांनी त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि शासनाचा उद्देश दिवाळीपूर्वी सर्व पात्र शेतकऱ्यांना मदत पोहोचविण्याचा आहे असे स्पष्ट केले.गेल्या काही दिवसांत नंदुरबार तालुक्यात ६५ मिमीपेक्षा जास्त पाऊस झाल्याने जिल्हा अतिवृष्टीग्रस्त घोषित करण्यात आला आहे. या पावसामुळे सुमारे २००० हेक्टर क्षेत्रातील पपई, केळी, कापूस आणि इतर पिकांचे नुकसान झाले आहे. प्रशासनाने तातडीने पंचनामे सुरू केले असून, अहवाल शासनाकडे पाठविण्याची प्रक्रिया युद्धपातळीवर सुरू आहे.

पालकमंत्री ड. कोकाटे म्हणाले,

शेतकऱ्यांना मदत मिळवून देणे ही आपली पहिली जबाबदारी आहे. विमा कंपन्यांचा कोणताही हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही. ज्या शेतकऱ्यांनी पिकविमा उतरवला आहे, त्यांना शासनाकडून पूर्ण मदत मिळेल. ते पुढे म्हणाले की,अतिवृष्टीसारख्या नैसर्गिक संकटांसमोर टिकाव धरणारे कृषी धोरण राबवले पाहिजे. केळी आणि पपईसारख्या पिकांच्या नुकसानातून शिकून नवे निर्णय घेण्याची वेळ आली आहे. यासाठी शासन पातळीवर पुढाकार घेण्यात येणार आहे.

या पाहणी दौऱ्यात मा.आमदार राजेश पाडवी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सी.के. ठाकरे, महसूल आणि कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते. प्रशासनाकडून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित दिलासा मिळावा यासाठी समन्वयात्मक कार्यवाही सुरू आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077